माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/००६/२०१९
दि.०४/०२/२०१९.

O/C

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.शिवप्रकाश रामनयन तिवारी, ................अपिलार्थी
(सचिव) ग्राहक समाज सेवा संस्था,
९९/ए.बी. रामीबाई हाऊस जुना प्रभादेवी मार्ग,
मुंबई ४०००२५.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.शिवप्रकाश रामनयन तिवारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.१९/११/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) सन २००७ साली मिरा भाईंदर महानगरपालिका सेवेत अस्थायी भरती करण्यात आलेले ६९ कर्मचाऱ्यांची यादी सत्यप्रत देण्यात यावी.
२) ज्या आधारे उदा.आदेश, मंजुरीने सदर भरती करण्यात आली होती. त्याची सत्यप्रत देण्यात यावी.
३) भरती करण्यात आलेले ६९ कर्मचाऱ्यांमधील सर्व कनिष्ठ अभियंता, लिपिक, शिपाई व सफाई कामगार यांचे नाव, हुद्दा, संकेताक्रसहरकान्यात सविस्तर माहिती व संबंधित दस्ताऐवजची सत्यप्रती देण्यात यावी.
४) २००७ साली मिरा भाईंदर महानगरपालिकेत भरती करण्यात आलेले ६९ कर्मचाऱ्यांनी स्थापना विभागात सादर केलेले सर्व दस्ताऐवजची पुराव्याची प्रत देण्यात यावी.
५) २००७ साली मिरा भाईंदर महानगरपालिकेत भरती करण्यात आलेले ६९ कर्मचाऱ्यांची नावे, हुद्दा, खातेस आजरोजी ज्या ज्या प्रभाग समिती विभागात कर्तव्यावर कार्यरत आहे. त्याचे संपुर पत्ता, यादी सत्यप्रत देण्यात यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत मागितलेली माहिती जाणूनबुजून कट करुन पुरविलेली नाही. तसेच त्यांनी अपुर्ण माहिती दिल्याने अपिलार्थी यांनी दि.१५/०१/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**<u>सुनावणीचा तपशिल:-</u>**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.३०/०१/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/००७/२०१९ दि.२१/०१/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, सदर दिवशी मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) हे कार्यालयीन कामकाजाकरिता एम.एम.आर.डी.ए. येथे बैठकीसाठी गेले असल्याकारणाने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणीस दि.०४/०२/२०१९ रोजी दुपारी ०३.०० वाजता उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.आस्था/०१०/२०१९ दि.३०/०१/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.१९/११/२०१८ रोजीच्या पत्रानुसार जाणूनबुजून माहिती दिलेली नसुन माहिती अपुर्ण स्वरुपाची दिलेली आहे.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: <u>निर्णय</u> :-

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास ६९ कर्मचाऱ्यांपैकी उर्वरित २० कर्मचाऱ्यांची माहिती तसेच ६९ कर्मचाऱ्यांच्या सांकेतांक क्रमांकाची माहिती विनाशुल्क स्वरुपात ७ दिवसांत उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (आस्थापना)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.शिवप्रकाश रामनयन तिवारी,
(सचिव) ग्राहक समाज सेवा संस्था,
९९/ए.बी. रामीबाई हाऊस जुना प्रभादेवी मार्ग,
मुंबई ४०००२५.

4/2/19

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.